॥अंतरी पेटवू ज्ञानज्योत॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१
# NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON- 425001
## (निवडणूक शाखा)

## परिपत्रक क्र.02/2018

### मतपत्रिकेवर मत नोंदविणे, मतपत्रिका अवैध ठरविणे इत्यादिबाबतची सविस्तर नियमावली

सर्व संबंधितांना या परिपत्रकान्वये कळविण्यांत येते की, विद्यापीठामार्फत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम २८ (२) (न) नुसार नोंदणीकृत पदवीधर गटामधून अधिसभेवर निवडून द्यावयासाठी निवडणुकीची कार्यवाही सुरु असून, रविवार, दिनांक २१.०१.२०१८ रोजी जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील एकुण २६ मतदान केंद्रांवर सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०५.०० या वेळेत मतदान होणार असून मतमोजणी दिनांक २४.०१.२०१८ रोजी सकाळी ०८.०० वाजेपासून विद्यापीठात सुरु होणार आहे. त्याअनुषंगाने मतपत्रिकेवर मत नोंदविणे, मतपत्रिका अवैध ठरविणे इत्यादिबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीन्वये शासनाने दिनांक १७ मे, २०१७ रोजी निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक ०१ च्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यांत येत आहेत :

**-: मतदारांसाठी महत्वाच्या सूचना : -**

**(A) मतपत्रिकेवर मत नोंदविणे:-**

(१) प्रत्येक मतदारास एक हस्तांतरणीय मत असेल.

(२) मतदार त्याचे मत नोंदवतांना :

(क) 'पसंतीक्रम' या स्तंभात ज्या उमेदवाराला मतदान करील त्या उमेदवाराच्या नावासमोर त्याच्या मतपत्रिकेवर अंक '१' नमूद करील;

(ख) याशिवाय, त्याला जेवढया अन्य अमेदवारांना मत द्यायचे असेल त्यांच्या संबधित नावासमोर त्याची निवड किंवा पसंतीक्रम अंक '२', '३', '४' असे सलग अंक नमूद करुन दर्शविल;

(ग) एक मतपत्रिकेवर दोन भाषेत पसंतीक्रम नमूद करु नयेत व सर्व पसंतीक्रम एक तर इंग्रजी भाषेत किंवा मराठी भाषेत नमूद करेल.

(घ) पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करणार नाही.

(३) मतदान केंद्रावर मतपत्रिकेवर पसंती क्रमांक नोंदविण्यासाठी जो पेन पुरविला जाईल, त्याच पेनने पसंती क्रम नोंदवायचा आहे.

(४) मतपत्रिकेवर पसंती क्रमांक १ नोंदविणे आवश्यक आहे.

(५) मतदानासाठी देण्यांत येणा-या सर्व मतपत्रिकांवर मतदारांनी त्यांच्या पसंतीनुसार क्रमांकाची नोंद अंकी (जसे - 1, 2 किंवा १, २) स्वरुपात करावी. पसंतीदर्शक आकडे अंकातच इंग्रजी किंवा मराठी या पैकी कोणत्याही एका भाषेत परंतु एकाच पध्दतीने लिहिणे आवश्यक आहे. पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करु नये. मतदाराने आपल्या पसंतीचे प्रथम क्रमांकाचे मत हे मतपत्रिकेवर नोंदवलेच पाहिजे. तसे न केल्यास मतपत्रिका अवैध ठरेल.

**(B) <u>मतपत्रिका अवैध ठरणे</u>:-**

**मतपत्रिकेत जर .......**

क) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' दर्शवण्यात आला नसेल,

किंवा

ख) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर दर्शवण्यात आला असेल,

किंवा

ग) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' व काही अन्य अंक एकाच उमेदवारांच्या नावासमोर दर्शवण्यात आले असतील;

किंवा

घ) प्रथम पसंतीक्रम किंवा त्यापुढील पसंतीक्रम, शब्दात किंवा रोमन अंकात किंवा इंग्रजी किंवा मराठी भाषा वगळून कोणत्याही अन्य भाषेच्या अंकात दर्शविण्यात आले असतील;

किंवा

ड) प्रथम पसंतीक्रम नोंदवण्यात आलेला उमेदवार निर्धारित करता येत नसेल;

किंवा

च) मतदाराने निवडणुकीमध्ये मतपत्रिकेवर जे नंतर ओळखता येईल असे कोणतेही चिन्ह नमूद केले असेल

किंवा

छ) निळ्या शाईखेरीज अन्य कोणत्याही शाईने पसंती दर्शविली असेल.

किंवा

ज) मतदाराची पसंती दर्शविणाऱ्या अंकांमध्ये कोणतीही खाडाखोड, गिरवागिरव किंवा फेरफार केला असेल,

किंवा

झ) मतदारांनी मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदविल्यावर सदर मतपत्रिका इतरांना दाखविल्यास मतपत्रिका बाद केली जाईल.

ट) मतपत्रिकेवर फुलीची (X) किंवा बरोबरची (✓) खूण करुन मत नोंदविलेले असल्यास.

ठ) पसंती क्रमांक योग्य त्या दिलेल्या जागेवर नमूद केले नसल्यास.

ड) पसंतीचे क्रमांक एकाच अंकात नसल्यास (उदा. पसंतीचे क्रमांक अनुक्रमाने नोंद करतांना १, २, ३, ४ . . . . ऐवजी ०१, ०२, ०३, ०४ . . . . असे क्रमांक नोंद केल्यास मतपत्रिका अवैध होते.)

ढ) एकापेक्षा अधिक उमेदवारांना देण्यात आलेला पुढील पसंतीक्रम असलेली वैध मतपत्रिका अशा लगतनंतरच्या पसंतीक्रमासाठी मतपत्रिका अवैध ठरेल.

(C) <u>मतदारांसाठी इतर सूचना:-</u>

मतदाराने ओळखपत्र म्हणून खालीलपैकी एक कागदपत्र मतदानाच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

(१) आधार कार्ड (२) निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र (३) पारपत्र (४) फोटो असलेले पॅनकार्ड ५) वाहन चालविण्याचा फोटो असलेला परवाना (६) शासकीय / निमशासकीय सेवेत कार्यरत असल्यास नियोक्त्याचे ओळखपत्र.

तरी सर्व संबंधितांनी उपरोक्त नियमावलीचे पालन करुन, मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यांस विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

संदर्भ क्र.उमवि/०२/निवडणूक/३६/२०१८
दिनांक: १५.०१.२०१८

(भ.भा.पाटील)
कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी